PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 6, ISSUE 4

# नारदीय कीर्तन परंपरेचे संजीवक : श्री. गोविंदबुवा होशिंग

**सुषमा मुरलीधर दाणी**
संशोधक विद्यार्थी,
पदव्युत्तर संगीत विभाग
एस. एन. डी. टी. महिला विदयापीठ,
चर्चगेट (**महाराष्ट्र**) **भारत**

**डॉ. संगीता बापट**
मार्गदर्शक,
पदव्युत्तर संगीत विभाग
एस. एन. डी. टी. महिला विदयापीठ,
चर्चगेट (**महाराष्ट्र**) **भारत**

## प्रस्तावना-

कीर्तन चांग कीर्तन चांग, होय अंग हरिरुप II १ II
प्रेमे छंदे नाचे डोळे, हरपले देहभाव II २ II
एकदेशी जीवकळा, हा सकळा सोयरा II ३ II
तुका म्हणजे उरला देव, गेला भेव त्या फळे II ४ II

कीर्तन हे देवर्षि नारद सनक, सनंदन, सनत् कुमार व सूत मुनी यांनी केले असे मानले जाते. या कीर्तनाचा इतिहास वैदिक काळापासून मानला जातो. कीर्तन ही सर्वश्रेष्ठ भक्ती आहे. नवविधा भक्तिंपैकी ही व्दितीय भक्ती गणली जाते.

कीर्तनाव्दारे भक्ती व समाज जागृती साधली जाते. देवर्षि नारदांनी विणा हातात घेवून, अखंड हरिनामाचा जप करीत संपूर्ण जगाला भक्तीची प्रेरणा दिली. त्यांच्या पासूनच ही नारदीय कीर्तन परंपरा प्रचारात आली.

जसजसा काळ बदलत गेला, तसतसे कीर्तनाचे स्वरुप देखिल बदलत गेले. भक्तीचा प्रसार करणारे कीर्तन समाजातील सामाजिक विषयांचा आधार घेवून, जनजागृतीचे मोठे कार्य कीर्तनाव्दारे कीर्तनकार करु लागले.

याच कीर्तनात आमुलाग्र बदल केला तो श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य तारकाश्रम स्वामी महाराज म्हणजेच कीर्तनाचार्य गोविंदबुवा होशिंग यांनी. त्यांनी नारदीय कीर्तन पध्दतीला सूत्रबध्दता आणली. त्यांनी कीर्तन पध्दतीचा पूर्ण अभ्यास करुन त्याचा ढाचा तयार केला. अशी ही सुत्रबध्द कीर्तन परंपरा सव्वाशे वर्षांपासून आजही तितक्याच पवित्रतेने जतन केली जात आहे.

**श्री. गोविंदबुवा होशिंग यांचा जीवन प्रवास :-**

श्री. गोविंदबुवा यांचा जन्म शके १७३६ (संवत १८७०) साली झाला. त्यांच्या आईचे नाव जिजाबाई तर वडिलांचे नाव यज्ञेश्वर दाजी असे होते. त्यांचे मूळचे वास्तव्य श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे होते. नाशिक मध्ये कीर्तनाचा विशेष प्रभाव असल्याने, त्यांना नाशिक येथे राहण्यासाठी घर बक्षीस दाखल मिळाले. त्यामुळे त्यांचे कायमचे वास्तव्य नाशिक येथे झाले. ते उत्तम कीर्तनकार होते. तसेच पाठांतरही उत्तम होते. कीर्तन हा त्यांचा वंशपरंपरागत व्यवसाय होता. ते ज्या देवतेपुढे कीर्तनास उभे राहत, त्या देवतेचे चरित्र ते वर्णन करीत. हाच कीर्तनाचा वारसा श्री. गोविंदबुवा महाराज यांच्याकडे आला.

श्री. गोविंदबुवा यांचे बालपण अशा आध्यात्मिक वातावरणात गेल्याने, बाल्यावस्थेत म्हणजेच वयाच्या केवळ नवव्या वर्षी आपल्या मित्रांसोबत खेळत असतांना थट्टेने त्यांनी कीर्तन करुन दाखविले. वडिलांचा सहवास, तीव्र बुध्दीमत्ता, त्याच जोडीला ईश्वरदत्त कंठमाधुर्य यांमुळे थट्टेने केलेल्या कीर्तनाने बालश्रोते प्रसन्न झाले व हे कीर्तन शिरोमणि श्री. हरिबाबाशास्त्री यांच्या कानांवर पडले. त्यांना महाराजांचे हे कीर्तन खूप भावले व पुढे हा उत्तम कीर्तनकार होईल. असे त्यांच्या लक्षात आले व त्यांनी दुसऱ्या दिवशी श्री. गोविंदबुवांना आपल्या घरी बोलवून उपदेश केला. “ गोविंदा, तुझे वडील कीर्तन करीत आले आहेत. तुला सुध्दा पुढे कीर्तनच केले पाहिजे. त्यात तुला ईश्वराने कंठही फार सुरवर दिला आहे. तुझे कीर्तन मी काल ऐकले. केवळ थट्टेने केलेले कीर्तन ऐकून श्रोते प्रसन्न झाले, तर

अभ्यासाने चांगली विद्वत्ता संपादन करुन कीर्तन करु लागशील तर मोठमोठे राजे, महाराजे तल्लीन होतील. इतकेच नव्हे तर साक्षात ईश्वरही प्रसन्न होईल असे मला वाटते." हे वाक्य ऐकताच श्री. गोविंदबुवांचे डोळे पाणावले व हरिबाबांच्या चरणावर मस्तक ठेवून म्हणाले. " मी आपल्याकडे कीर्तनाचा अभ्यास करीन. अशी शपथ घेतो. " श्री. हरिबाबा महाराजांच्या या वाक्यामुळे फार संतुष्ट झाले व श्री. गोविंदबुवांच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवला.

**श्री. गोविंदबुवांचा विद्याभ्यास :-**

बालपणी बुवांचे कीर्तनाचे शिक्षण श्री. हरिबाबाशास्त्री यांच्याकडे सुरु झाले. प्रथम रुपावली, समयचक्र, अमरकोश शिकवून नंतर काव्य, ग्रंथांबरोबरच स्वरचित भक्तिरसायन काव्य देखील शास्त्रीबुवांनी गोविंदबुवांना शिकविले. फक्त चार तासांची झोप घेवून गोविंदा, गुरुंनी दिलेला अभ्यास करीत असे. दिवसरात्र पाठांतर करणे हा त्यांचा दिनक्रम असे. भोजनात वेळ जातो म्हणून घरी सांगत की, गुरुजींकडे भोजन केले व गुरुंना सांगावे घरी भोजन केले. याप्रमाणे सतत ६ वर्षे तहानभूक हरपून त्यांचा अभ्यास सुरु होता. श्री. गोविंदा हे १५ वर्षांचे झाले, तेव्हा गुरुंनी आज्ञा केली की, आता तुम्ही चातुर्मास्य कीर्तन करुन वडिलांना विश्रांती द्यावी. ही आज्ञा शिरसावंद्य मानून आई, वडिल, गुरु यांना साष्टांग नमस्कार करुन श्री गोरेराम मंदिरात प्रथम चातुर्मास्य कीर्तनास त्यांनी प्रारंभ केला. उत्तम कीर्तनशैली असल्याने थोडयाच दिवसांत दिड हजार ते दोन हजार श्रोते जमू लागले व हळूहळू त्यांची कीर्तनातील लोकप्रियता सर्वदूर पसरु लागली.

**श्री. गोविंदबुवा यांचे नारदीय कीर्तनातील योगदान :-**

श्री. गोविंदबुवांनी कीर्तनाच्या प्रचाराकरिता अनेक भौगोलिक प्रांत पादाक्रांत केलीत. जसे - पुणे, खान्देश, माळवा (इंदौर), श्री रामेश्वर, व्दारकेश्वर, ग्वाल्हेर, काशी, गया, प्रयाग या व अशा अनेक ठिकाणी जावून कीर्तनाचा प्रचार व प्रसार त्यांनी निरपेक्ष भावनेने केला. संपूर्ण आयुष्यभर त्यांनी कीर्तनसेवा केली. तसेच कीर्तन संप्रदायात अपूर्व अशी उत्क्रांती केली. महाराजांच्या आधी महाराष्ट्रात सुरु असलेल्या कीर्तन परंपरेचे स्वरुप त्यांनी बदलले. परंतु हा बदल करीत असतांना त्यांनी कोणत्याही अन्य कीर्तन प्रणालीचा अवमान केला नाही.

नारदीय कीर्तनाला शास्रशुध्दतेचे रुप दिले ते गोविंदबुवांनी. नारदीय कीर्तनाचा संपूर्ण ढाचा त्यांनी शास्रशुध्द पध्दतीने तयार केला. या कीर्तनाचा आरंभ पंचपदीतील " **जय जय राम कृष्ण हरी** " या पदाने होतो. हे पद स्वत: महाराजांनी रचलेली आहे आणि आजतागायत संपूर्ण महाराष्ट्रात ते गायले जाते. श्री. गोविंद महाराजांनी नारदीय कीर्तनाचा पूर्वरंग, उत्तररंग यात जराही बदल केला नाही. परंतू दोन्हींत आपल्या ज्ञानाने शास्रशुध्द रितीने बदल केले.

प्रथम नमन म्हणजे " **मंगलाचरण** " होते. नंतर पद (पूर्वरंगपद) म्हटले जाते आणि मग " **कृष्णाराम** " हे गजराचे पद म्हणून त्यानंतर पूर्वरंग पदावर निरुपण केले जाते. मध्यंतरात ईश्वरनामाच्या गजरात बुवांना हार घालतात. त्यांना व श्रोत्यांना अबीर बुक्का लावतात. आणि कीर्तन मूळपदावर येऊन आरती होते. तसेच नारदीय कीर्तनात पेटी, पखवाज, सारंगी, सुंदरी यांसारख्या वाद्यांची साथही बुवांनी सुरु केली. इतकेच नव्हे तर कीर्तनकाराचा पोषाख, आचार व अभ्यासक्रम कसा असावा ? याबद्दल संहिता तयार केली. नारदीय कीर्तनाला सुव्यवस्थित रुप देण्याचे आणि वाद्यमेळाची जोड देवून कीर्तन समृध्द करण्याचे महत्त्वाचे कार्य श्री. गोविंदबुवांनी केले. त्यांनी आख्यानात नवरस आणले. नारदीय कीर्तनातील उत्तररंगात असलेली आख्याने स्वत: लिहिली. " **आख्यान कविता** " हा स्वतंत्र व वेगळा प्रकार त्यांनी रुढ केला. त्यात मोरोपंत, वामन पंडित, अमृतराय मध्वमुनीश्वर, विठोबा अण्णा, दप्तरदार, रघुनाथ पंडित आदींच्या आख्यान कविता, कीर्तनात समाविष्ट केल्या. श्री. बाळकृष्ण महाराजांचे अनंत उपकार या कीर्तन परंपरेवर आहेत. बुवांचे हे सांगितिक योगदान कीर्तनाच्या ऐतिहासिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

**श्री. गोविंद बुवांची शिष्यपरंपरा :-**

बुवांनी आपल्या आयुष्यात अनेक शिष्य तयार केले.

१) कै. वा अन्याबाबुवांचे चिरंजीव रा. रा. माधवराव बुवा दशपुत्र
२) ह.भ.प. रामकृष्णबुवा ढोले
३) ह.भ.प. कावडीबुवा
४) ह.भ.प. विष्णुबुवा लळीत कीर्तनाचार्य

५) कै.वा. गोपाळबुवांचे शिष्य ह.भ.प. विनायकबुवा उजैनकर

६) ह.भ.प कृष्णबुवा सारमंडळ

७) ह.भ.प. गणपतीबुवा भुसावळकर

८) ह.भ.प. पुरुषोत्तमबुवा जोशी

९) ह.भ.प. विठ्ठलबाबा सोहनी

१०) ह.भ.प. जयरामबुवा पुरोहित

हे व असे अनेक उत्तम शिष्य बुवांनी तयार केले आहेत.

## निष्कर्ष :-

श्री. गोविंदबुवा होशिंग यांनी आपले संपूर्ण आयुष्य कीर्तनाचा प्रचार व प्रसार करण्यात व्यतित केले. त्यांनी नारदीय कीर्तनात केलेले आमूलाग्र बदल, शास्त्रीय नियमांमध्ये नारदीय कीर्तनाची संहिता तयार केली. अस्ताव्यस्त असलेल्या कीर्तनास एक साचात बांधून शिस्तबध्दपणा आणला. कीर्तनकाराने कोणता पोषाख परिधान करावा ? तसेच त्याचे आचरण कसे असावे ? कीर्तनाचा अभ्यासक्रम या सर्व महत्त्वपूर्ण गोष्टींचा अंतर्भाव त्यांनी कीर्तनात केला. आजतागायत त्याच पध्दतीने ही कीर्तन परंपरा अखंडित सुरु आहे. श्री. गोविंदबुवा महाराज उर्फ तारकाश्रम स्वामी महाराज यांनी जे महनिय कार्य या कीर्तन परंपरेत केले तसे कार्य पुन्हा होणे नाही.

## संदर्भ :-

१) श्रीमत परमहंस परिव्राजकाचार्य तारकाश्रम स्वामी महाराज कीर्तनाचार्य गोविंदबुवा होशिंग, नाशिक यांचे चरित्र.

**लेखक :-** रा. रा. रामकृष्ण गोविंदबुवा ढोले, मुंबई,

**प्रकाशक** :- श्री. दत्तात्रय बाळगोविंद होशिंग

६६५, होशिंग वाडा, ग्यानुपागा लेन, रविवार पेठ, नाशिक.

२) **Web sight :- books.google.co.in**